**सीएनआर क्र. एमएच एसआय ०७—०००४३२—२०१४**

**<u>नियमित दरखास्त क्र. १९/२०१४ मधील नि.क्र. २७ वरील आदेश</u>**

मुळ दरखास्त नि.दि.मु.क्र. ३४/२००० या दाव्यातील हुकूमनाम्याची अंमलबजावणी होवून मिळण्यासाठी दाखल करण्यात आली आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज दरखास्तदाराने नि.दि.मु.क्र. ३४/२००० व अंतिम निवाडा अर्ज क्र. २/२००७ या अर्जातील अंतिम आदेशानुसार वादग्रस्त खोल्यांचा खुला व मोकळा कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. ही अभिलेखावरील बाब आहे की, प्रस्तुतकामी फेरन्यायालयीन आयोग होवून नि.क्र. २३ वर न्यायालयीन आयुक्त यांनी त्यांचा अहवाल सादर केलेला आहे. नि.क्र. २३ वरील अहवालात सुचविल्याप्रमाणे वादग्रस्त खोल्यांचा कब्जा बेलिफांमार्फत मिळण्याची दरखास्तदार याची मागणी आहे. प्रस्तुतकामी सामनेवाला हे सदर अर्जावर आक्षेप घेण्याकरीता आजरोजी हजर नाहीत.

०३. दरखास्तदारातर्फे संपूर्ण युक्तिवाद ऐकला. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले. सहाय्यक अधीक्षक मालवण न्यायालय यांच्या अहवालाचे अवलोकन केले असता; प्रस्तुतकामी माननीय वरिष्ठ न्यायालयाकडून स्थगितीचा आदेश या न्यायालयास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. नि.दि.मु.क्र. ३४/२००० या दाव्यातील अंतिम न्यायनिर्णय व हुकूमनाम्याचे आणि अंतिम निवाडा अर्ज क्र.०२/२००७ यामधील अंतिम आदेशाचे अवलोकन केले. अर्जात दरखास्तदाराने नमूद केल्याप्रमाणे नि.क्र. २३ वरील न्यायालयीन आयुक्त अहवाल विचारात घेता; दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्र. २१ नियम ३५ अन्वये वादग्रस्त घर क्र. ४७ मधील दरखास्तदाराच्या हिश्श्यांचा खुला व मोकळा कब्जा बेलिफामार्फत देणे उचित राहील. अर्ज नामंजूर झाल्यास दरखास्तदार याचेच अतोनात असे नुकसान होणार असल्याची दाट शक्यता दिसून येते. याउलट अर्ज मंजूर करण्याने कोणत्याही सामनेवालाचे नुकसान होणार असल्याची शक्यता दिसून येत नाही. सबब खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. नि.दि.मु.क्र. ३४/२००० या दाव्यातील अंतिम हुकूमनाम्यानुसार वादग्रस्त घर क्र. ४७ मधील दरखास्तदार व सामनेवाला यांच्या हिश्श्यांचा नि.क्र. २३ वरील न्यायालयीन आयोग अहवालात सुचविण्यात आलेल्या वाटपाप्रमाणे खुला व मोकळा कब्जा त्यांना देण्यात यावा.

३. दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम २१ नियम ३५ या तरतुदीअन्वये ताबा वॉरंट जारी करण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक :—२७ जुलै, २०१८ (आर.आर.काळे)
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.